कि.फौ.ख.क्र. ८७९/२०२२
मिना वि. योगेश
नि. क्र. २४ पुढे

**उर्वरीत उलटतपास गैरअर्जदार तर्फे विधीज्ञ श्रीमती किशोरी जावडे यांचे व्दारे शपथेवर सुरु.**

६. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक ०८.०७.२०२१ रोजी मी आणि गैरअर्जदार दवाखान्यात गेल्यावर पहिल्यांदा समजले की माझी गर्भपिशवी ही विकसित नाही त्यामुळे मला मुलं होऊ शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, लग्नाच्या बोलणीच्या वेळेस गैरअर्जदार यांना माझी गर्भपिशवी विकसित नाही याची माहिती मी त्यांना दिली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, लग्नानंतर सुद्धा मी गैरअर्जदार यांना सांगितले नाही की मला मासिक पाळी येत नाही. हे म्हणणे खरे नाही की, लग्नाच्या पहिल्याच महिन्यापासून गैरअर्जदार हे मला मुलं होत नाही या कारणावरुन त्रास देत होते ही बाब मी खोटी सांगितली आहे. हे म्हणणे खरे नाही की, गैरअर्जदार यांना मी लग्नाच्या वेळी सांगितले होते की मी पार्लरचा बिझीनेस करते. दिनांक १५.०७.२०२१ रोजी मी नागपूर येथे बारशासाठी आणि गुरुपोर्णिमा साठी परत आली होती.

७. हे म्हणणे खरे नाही की, गैरअर्जदार यांनी त्यांच्या सर्विस बुकमध्ये माझ्या नावाची नोंद करण्याकरीता माझे दहावी व बारावीचे दस्तऐवज मागितले होते. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या शपथपत्रातील मजकूर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी गैरअर्जदार यांच्यासोबत नांदण्याचा प्रयत्न केला नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी गैरअर्जदार यांच्यासोबत नांदण्यासाठी कुठलेही प्रकरण दाखल केले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे शपथपत्र आणि खोटी केस दाखल केली आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास काही नाही.**

समक्ष

Sd/-

दिनांकः १५.०७.२०२६

(श्रीमती एम.वाय. नेमाडे)
२१वे सह दि.न्या.व.स्तर व अति
मुख्य न्यायदंडाधिकारी, नागपूर